आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

४ जून २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये भाजपा **२४२** तर काँग्रेस **९५** जागांवर आघाडीवर / कर्नाटकमधे हसन मतदारसंघाचा निकाल जाहीर- काँग्रेसचे श्रेयस पटेल विजयी
- **महाराष्ट्रात ४८** मतदारसंघांपैकी भाजपा **१३** तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला प्रत्येकी **१०** जागांवर आघाडी
- आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या निकालात **१७५** पैकी **१३१** जागांवर तेलुगु देसम आघाडीवर
- लोकसभा निवडणुकांच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर शेयर बाजारात कोरोना काळा नंतरची सर्वात मोठी घसरण

  **आणि**
- हमासने अपहरण केलेल्या इस्रायली नागरिकांपैकी आणखी चार जणांचा मृत्यू

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या सुरवातीच्या कलांनुसार एकूण ५४३ मतदारसंघापैकी २४२ ठिकाणी भाजपा उमेदवार आघाडीवर आहेत. काँग्रेसचे उमेदवार ९५ मतदारसंघात आघाडीवर आहेत. समाजवादी पार्टी ३६ ठिकाणी आघाडीवर आहे. तेलगु देसम पार्टीचे उमेदवार १६ , तृणमूल काँग्रेसचे उमेदवार ३१ मतदारसंघात आघाडीवर आहेत . द्रमुकचे उमेदवार २१ ठिकाणी तर जनता दल उमेदवार १५ जागांवर प्रतिस्पर्ध्यांच्या पुढे आहेत. ६ मतदारसंघांमधे अपक्ष उमेदवारांना आघाडी मिळाली आहे.

**आंध्र प्रदेशात** एकूण ४२ मतदारसंघांपैकी तेलगू देसम _१६_. वाय एस आर काँग्रेसनं __४_ तर भाजपानं _३_ जागांवर आघाडी घेतली आहे.

**अरुणाचल प्रदेशात** भाजपानं दोन्ही जागांवर आघाडी घेतली आहे.

**आसाममध्ये** एकूण १४ जागांपैकी भाजपनं __८__ जागांवर तर काँग्रेसनं ४___ जागांवर आघाडी घेतली आहे.

**बिहारमध्ये** एकूण ४० जागांपैकी जनता दल संयुक्त _१५_ , भाजप _१३_, लोक जनशक्ती पार्टी _५_ जागांवर तर राष्ट्रीय जनता दल ३_ जागांवर आघाडीवर आहे.

**छत्तीसगडमध्ये** भाजपनं १० तर काँग्रेसनं एका जागेवर आघाडी घेतली आहे.

**गोव्यात** भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहेत

**गुजरातमध्ये** भाजप २५ आणि काँग्रेस एका जागेवर आघाडीवर आहेत

गुजरातमधील मतमोजणीच्या परिस्थितीबाबत अधिक माहिती यांच्या प्रतिनिधी अपर्णा खुंट यांच्याकडून --------

**व्हाईस कास्ट--(अपर्णा खुंट)**

**हरयाणात** काँग्रेसनं ५ जागांवर तर भाजपनं ४ जागांवर आघाडी घेतली आहे.

**हिमाचल प्रदेशात** भाजप सर्व ४ जागांवर आघाडीवर आहे.

**झारखंडमध्ये** १४ मतदारसंघांपैकी भाजपनं _९_ जागांवर आघाडी घेतली असून काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चा प्रत्येकी _२_ जागांवर आघाडीवर आहे.

**कर्नाटकात** २८ मतदारसंघांपैकी भाजप __१६_ जागांवर, काँग्रेस _१०_ जागांवर आघाडीवर असून जनता दल सेक्युलर __२_जागांवर आघाडीवर आहे.

**केरळमध्ये** २० मतदारसंघांपैकी काँग्रेस __१३___ जागांवर आघाडीवर भाजपनं ___२__ जागांवर आघाडी घेतली असून मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी एका जागेवर आघाडीवर आहे.

**मध्य प्रदेशात** २९ मतदारसंघांपैकी सर्व २९ मतदारसंघात भाजपनं आघाडी घेतली आहे.

**महाराष्ट्रात** ४८ मतदारसंघांपैकी भाजपा १३ तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने प्रत्येकी _ १०_ जागांवर आघाडी घेतली आहे.

**मणिपूरमध्ये** २ मतदारसंघांपैकी काँग्रेस आणि नागा पीपल्स फ्रंटनं प्रत्येकी एका जागेवर आघाडी घेतली आहे.

**मेघालयात** २ मतदारसंघांपैकी पीपल्स पार्टी आणि काँग्रेसनं प्रत्येकी एका जागेवर आघाडी घेतली आहे.

**मिझोराममध्ये** असलेल्या एकाच जागेवर झोराम पीपल्स मुव्हमेंट आघाडीवर आहे.

**नागालँडमध्ये** असलेल्या एकाच जागेवर काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे.

**ओदिशात** २१ मतदारसंघांपैकी भाजपानं __१९_ जागांवर आघाडी घेतली असून बिजू जनता दल आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागी आघाडीवर आहे.

**पंजाबमध्ये** १३ मतदारसंघांपैकी  काँग्रेसनं _६_ जागांवर आघाडी घेतली असून आम आदमी पार्टी _३_जागांवर तर शिरोमणी अकाली दल  _२__ जागांवर आघाडीवर आहे.

**राजस्थानात** २५ मतदारसंघांपैकी  भाजपनं ___१४__ जागांवर तर काँग्रेस __८_ जागांवर आघाडीवर असून मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी,  राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टी आणि भारतीय आदिवासी पार्टी प्रत्येकी एका जागी आघाडीवर आहे.

**सिक्कीममध्ये असलेल्या** एकाच मतदारसंघात  सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा आघाडीवर आहे.

**तामिळनाडूत** ३९ मतदारसंघात द्रमुक _२१_  ठिकाणी आघाडीवर आहेत. काँग्रेस _८_ ठिकाणी आघाडीवर आहेत.

**त्रिपुरात** दोन्ही जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत.

**तेलंगणात** भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी __८_जागांवर आघाडीवर आहेत.

**उत्तर प्रदेशात** ८० मतदारसंघांपैकी  भाजपनं __३६_ जागांवर आघाडी घेतली असून समाजवादी पार्टी  _ ३४_ जागांवर तर काँग्रेस ___७__ आणि राष्ट्रवादी लोकदल २ जागांवर आघाडीवर आहे.

**उत्तराखंडमधे** एकूण ५ जागांपैकी भाजपानं सर्व पाचही जागांवर आघाडी घेतली आहे.

**पश्चिम बंगालमध्ये ४२** मतदारसंघांपैकी तृणमूल काँग्रेस __२९_ जागांवर तर भाजपनं _११_ जागांवर आघाडी घेतली आहे.

**अंदमान निकोबारमध्ये** असलेल्या एकाच जागेवर भाजपानं आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात वाराणसी मतदारसंघात भाजप नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तर मथुरा मतदारसंघात भाजपच्याच हेमामालिनी आघाडीवर आहेत. राहुल गांधी उत्तर प्रदेशात रायबरेली आणि केरळात वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढवत असून दोन्ही ठिकाणी ते आघाडीवर आहेत. अमेठी मतदारसंघात स्मृती इराणी पिछाडीवर आहेत. हिमाचल प्रदेशात भाजपच्या कंगना राणावत आघाडीवर आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात नारायण राणे आघाडीवर आहेत. गुजरातच्या गांधीनगर मतदारसंघात केंद्रीय मंत्री अमित शाह आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या मतदार संघांचा विचार केला तर ४८ मतदारसंघांपैकी १३ मतदार संघांमध्ये भाजपाने आणि काँग्रेसनं प्रत्येकी ११ जागांवर आघाडी घेतली आहे. शिवसेनेला ६ तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने १० जागांवर आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ६ तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एका जागेवर आघाडी मिळाली आहे.

संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या बारामती मतदार संघात राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे १४ हजार मतांनी आघाडीवर आहेत, तर सांगलीमध्ये अपक्ष उमेदवार विशाल पाटील ३ हजार ८३३ मतांनी आघाडीवर आहेत. नागपूर मतदारसंघात भाजपाचे नितीन गडकरी, रत्नागिरी सिंधुदुर्गमध्ये भाजपाचे नारायण

राणे, बीडमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे आघाडीवर आहेत. चंद्रपूरमध्ये भाजपचे सुधीर मुनगंटीवार पिछाडीवर असून तिथे काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांनी ५७ हजार ६६० मतांनी आघाडीवर आहेत. कल्याणमध्ये शिवसेनेचे श्रीकांत शिंदे तर ठाण्यात शिवसेनेचे नरेश म्हस्के आघाडीवर आहेत. रायगडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अनंत गीते यांच्यावर २९ हजार १३२ मतांची आघाडी घेतली आहे. अहमदनगरमध्ये भाजपाच्या सुजय विखे पाटील यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नीलेश लंके यांच्यावर ६ हजार १५ मतांची आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेश आणि ओदिशा विधानसभेच्या निवडणुकीची मतमोजणी आज सुरू आहे.

आंध्र प्रदेशातल्या **१७५** जागांपैकी **१३१** जागांवर तेलुगु देसम, **१८** जागांवर वायएसआर काँग्रेस, **१९** जागांवर जनसेना पक्ष तर **७** जागांवर भाजपाचे उमेदवार आघाडीवर आहेत.

ओदिशाच्या विधानसभेच्या **१४७** जागांपैकी **७२** जागांवर भाजपा, **५७** जागांवर बिजु जनता दल तर काँग्रेस **१५** जागांवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

**सोलापूर** लोकसभा मतदारसंघात सातव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार राम सातपुते त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांच्यापेक्षा ८ हजार ३३८ मतांनी आघाडीवर आहेत.

**गडचिरोली-चिमूर** मतदारसंघात चौथ्या फेरीअखेर काँग्रेसचे उमेदवार डॉ.नामदेव किरसान त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे अशोक नेते यांच्यापेक्षा २३ हजार ८६१ मतांनी आघाडीवर आहेत.

**उस्मानाबाद** लोकसभा मतदारसंघात चौथ्या फेरीअखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ओमप्रकाश राजे निंबाळकर ५३ हजार ६७७ मतांनी आघाडीवर आहेत.

**भंडारा-गोंदिया** मतदारसंघात महाविकास आघाडीचे प्रशांत पडोळे यांनी महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्यावर १ हजार ४६५ मतांनी आघाडी घेतली आहे.

**जळगाव** मतदारसंघात सातव्या फेरीअखेर महायुतीच्या उमेदवार स्मिता वाघ त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे करण पवार यांच्यापेक्षा ९६ हजार ६७७ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या काही मतदारसंघात उमेदवारांनी जवळ जवळ एक लाख किंवा त्याहून अधिक मतांनी आघाडी घेतली आहे. कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वैशाली दरेकर यांच्यावर १ लाख १४ हजार ४१२ मतांनी आघाडी घेतली आहे. याबाबत अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून....

**व्हाईस कास्ट -- (नवी मुंबई पीटीसी).... २६ सेकंद**

नंदुरबारमध्ये काँग्रेसचे गोवाल पडवी यांनी भाजपाच्या विद्यमान खासदार हीना गावीत यांच्यावर सुमारे दीड लाखाहून अधिक मतांनी आघाडी घेतली आहे.

नंदुरबारमधल्या एकंदर परिस्थितीबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर ……

**व्हाईस कास्ट -- (नंदूरबार पीटीसी)....२४ सेकंद**

**<><><><><>**

**मावळ** लोकसभा मतदारसंघात दहाव्या फेरीअखेर शिवसेनेचे श्रीरंग बारणे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजोग वाघिरे यांच्यापेक्षा ४४ हजार ७२८ मतांनी आघाडीवर आहेत.

**नाशिक** मतदारसंघात नवव्या फेरीअखेर महाविकास आघाडीचे राजाभाऊ वाजे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे हेमंत गोडसे यांच्यापेक्षा ८१ हजार २७४ मतांनी आघाडीवर आहेत.

**सोलापूर** मतदारसंघात नवव्या फेरीअखेर काँग्रेसच्या प्रणिती शिंदे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे राम सातपुते यांच्यापेक्षा ५ हजार १८० मतांनी आघाडीवर आहेत.

**जालना** लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्यात अटीतटीची लढत पहायला मिळत आहे. फेरीनिहाय निकालात डॉ. काळे आघाडी घेत आहेत. आतापर्यंत पाचव्या फेरीपर्यंतचे निकाल हाती आले असून डॉ. काळे सध्या ५ हजार ६४२ मतांनी आघाडीवर आहेत.

**वर्धा** लोकसभा मतदारसंघात सहाव्या फेरीअखेर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अमर काळे त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे रामदास तडस यांच्यापेक्षा १६ हजार ५८६ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज मोठी पडझड दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांकात ४ हजार ५१८ अंकांची घट होऊन तो ७१ हजार ९५१ वर आला. तर निफ्टीतही १ हजार ४१९ घट होऊन तो २१ हजार ८४४ अंकांवर आला.

आज सकाळी बाजाराच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा पहिल्या सत्रात सेंसेक्स १ हजार ७०० अंकांनी तर निफ्टी ५०० अंकांनी कोसळला. ही पडझड दुसऱ्या सत्रातही कायम राहिली. सेन्सेक्समध्ये सुमारे सहा हजारांची घट झाली आणि तो ७१ हजारांवर आला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ही सुमारे दोन हजारांनी कोसळला.

शेअर बाजारात झालेल्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांचं सुमारे १० लाख ३२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. कोरोनानंतर भारतीय शेअर बाजारात झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे.

**<><><><><>**

हमासनं अपहरण केलेल्यांपैकी आणखी चार जणांचा मृत्यू झाल्याचं इस्रायलच्या लष्कराने आज सांगितलं आहे. दक्षिण गाझामधल्या खान युनुसमध्ये इस्रायलनं केलेल्या कारवाईच्या वेळी हे चार जण मारले गेल्याचं इस्रायली लष्कराचे प्रवक्यां ुपसींांगितलं.

**<><><><><>**

अमेरिका आणि वेस्टइंडिजमध्ये होत असलेल्या आयसीसीच्या टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सामन्यांचं थेट समालोचन आकाशवाणीवरून प्रसारित केलं जाणार आहे.